# नाशिक महानगरपालिका,नाशिक.
## उद्याने आणि वृक्ष प्राधिकरण विभाग
## शहरातील मनपाच्या वृक्षांची जपणूक होण्याच्या दृष्टीने
## जाहीर इशारा नोटीस

महाराष्ट्र नागरि क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम (२०) पोटकलम (क) नुसार वृक्षांना इजा होईल असे कृत्य करणे हा दंडनीय अपराध आहे व त्यासाठी कारावासाची शिक्षा होऊ शकते.

असे निदर्शनास येते की, सार्वजनिक जागेवरील वृक्षांवर अनेक ठिकाणी संबंधीतांनी जाहिरातीचे बोर्ड किंवा बॅनर खिळे ठोकून किंवा अन्य अनुचित मार्गाने लावले आहेत. अशा प्रकारे वृक्षांचा उपयोग जाहिरातीच्या प्रगटीकरणासाठी करणे हे बेकायदेशिर असून त्यासाठी संबंधीतांना शास्ती लावण्याची तरतूद संबंधीत कायदयात आहे. तरी या नोटीशीद्वारे सर्व संबंधीतांना ताकीद देण्यात येते की, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पुढील ३ दिवसात ज्यांनी-ज्यांनी जाहिरातीसाठी अशा प्रकारे झाडांचा गैरवापर केला असेल त्यांनी झाडांलगत अथवा झाडांवरती लावलेले असे सर्व प्रकारचे बोर्ड स्वखर्चाने त्वरित काढून घ्यावेत ही नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर ३ दिवसानंतरही जर मनपा क्षेत्रात कोठेही झाडांचा उपयोग हा जाहिराती लावण्यासाठी केल्याचे आढळून आल्यास सदरची जाहिरात मनपाचे खर्चाने काढून टाकण्यात येईल व संबंधीतांकडून जाहिरात काढून टाकण्याचा खर्च तसेच झाडांना इजा पोहचवण्याबद्दलच्या दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल. तरी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसात सर्व संबंधीतांनी सार्वजनिक क्षेत्रातील वृक्षांवरती लावलेल्या जाहिराती/जाहिरातीचे बोर्ड स्वत:काढून टाकावेत.

सही XXX

**आयुक्त तथा सभापती,**
**वृक्ष प्राधिकरण समिती,**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**